# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/11/2021 (शुक्रवार)


---

## पोलीस स्टेशन कळमेश्वर मधील दुहेरी हत्त्येतील आरोपी राजेशकुमार चंदुलाल साहू यास अटक केल्याबाबत

फिर्यादी नामे ललित गणोरकर यांनी समक्ष पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दिनांक 27/09/2021 रोजी येऊन कळविले की, इसम नामे राजेशकुमार साहू नावाचा इसम हा दिनांक 23/09/2021 रोजी त्यांच्याकडे शेतीत काम मागण्याकरिता आला होता. त्यावेळी राजेशकुमार साहू याच्यासोबत 01 महिला व 01 मुलगी होती. सदरवेळी राजेशकुमार याने सोबत असलेली महिला व मुलगी ही त्याची बायको व मुलगी असल्याचे ललित गणोरकर यांना सांगितले. फिर्यादी यांना शेतीच्या कामासाठी माणसाची आवश्यकता असल्याने तसेच माणुसकी म्हणून त्यांनी राजेशकुमार साहू याला महिना 7,000/–रू. रुपये प्रमाणे कामावर ठेवले.त्यानंतर राजेशकुमार साहू व त्याचा परिवार हा फिर्यादी यांच्या शेतातील झोपडीत राहू लागला.सदरवेळी,फिर्यादी यांनी त्यांच्या ओळखी बाबतचा कुठलाही पुरावा घेतला नाही.

दिनांक 27/09/2021 रोजीच्या 11.00 वाजता फिर्यादी हे शेतात गेले असतांना त्यांना झोपडीचा दरवाजा बंद दिसला. म्हणून त्यांनी आवाज दिला.परंतु,कोणीही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी झोपडीत डोकावून पहिले असता साहू याची बायको व मुलगी या निपचित अवस्थेत जमिनीवर पडलेल्या दिसून आल्या.साहू याच्या बायकोच्या गळ्याभोवती दोरी होती.तसेच मुलीच्या हनुवटीवर तीक्ष्ण हत्याराने वार केल्याने जखम होऊन त्यातून रक्त निघाल्याचे त्यांना दिसले. त्यामुळे फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दिलेल्या तक्रारीवरून अपराध क्रमांक 532/21 कलम 302 भा.दं. विधान अन्वये नोंद करण्यात आलेला आहे.

नमूद गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने 01 पथक तयार करून त्यास आरोपीच्या मुळगावी चिचगाव,मध्यप्रदेश येथे पाठविले असता मयत महिला ही आरोपीची सासू नामे रामप्यारी गिरधर साहू, वय 44 वर्षे व मयत मुलगी ही आरोपीची मेहुणी नामे राणी गिरधर साहू,वय 09 वर्षे असल्याची माहिती समजली.पाहिजे आरोपी याचा शोध घेनेकामी स्थानिक गुन्हे शाखेचे 01 पथक हे हावडा,पश्चिम बंगाल,तसेच पोलीस स्टेशन कळमेश्वर यांचे 01 पथक चंद्रपूर येथे पाठविण्यात आले. परंतु,आरोपी हा तिथून पसार होण्यास यशस्वी झाला.

गुन्हा घडल्यापासून आरोपी हा चंद्रपूर,हावडा(पश्चिम बंगाल), मय्यर (मध्यप्रदेश), सिकंदराबाद(आंध्र प्रदेश), बेंगळूरू,तल्ली (कर्नाटक) असे वारंवार त्याचे ठिकाण बदलत असल्याने व आरोपीबाबत फार कमी माहिती असल्याने त्याला पकडणे अवघड जात होते.

आज दिनांक 19/11/2021 रोजी नमूद गुन्ह्यातील आरोपी हा त्याचे ओळखपत्र बनविण्याकरिता तो याअगोदर राहत असलेल्या बेसा,नागपूर परिसरात येणार असल्याबाबत गोपनीय माहिती ठाणेदार आसिफराजा शेख यांना मिळाल्याने त्यांच्या आदेशाने सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण मुंडे व पोलीस नाईक रवी मेश्राम हे खाजगी वाहनाने तात्काळ रवाना होऊन त्यांनी बेसा चौक येथे सापळा रचला असता आरोपी हा बालाजी इंटरप्राईजेस दुकानात आला. त्यावेळी स.पो.नि.प्रवीण मुंडे,पोलीस नाईक रवी मेश्राम यांनी सदर दुकानाचे मालक पियुष भास्करवार व बेलतरोडी पोलीस स्टेशनच्या अमलदारांच्या सहायाने त्याला ताब्यात घेतले.

आरोपी याच्याकडे अद्याप केलेल्या तपासात सदर आरोपी व त्याची सासू रामप्यारी यांचे मागील 03 वर्षापासून अनैतिक संबंध असल्याचे त्याने सांगितले.सदर अनैतिक संबंध हे आरोपी याला तोडायचे होते.परंतु,त्याची सासू रामप्यारी ही त्यास विरोध करायची व वारंवार त्याच्याशी भांडणे करायची.त्यास वैतागून आरोपी याने सासूचा खुन करायच्या उद्देशाने काम मागायचा बहाणा करून निर्जन ठिकाणावरील फिर्यादीची शेती पाहिली.त्यावेळी,सदर शेतीच्या मालकास कामाची गरज असल्याचे भासवून आरोपी याने त्याची ओळख पटणार नाही या उद्देशाने आपल्या ओळखीबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा फिर्यादी यांना सादर केला नाही.तरी,सर्व जनतेस आवाहन करण्यात येत आहे कि,कुठल्याही अनोळखी व्यक्तीस कामावर ठेवताना त्याच्या ओळखीबाबतची कागदपत्रे घ्यावीत. तसेच त्याबाबत जवळच्या पोलीस स्टेशनला माहिती द्यावी.

उपरोक्त कामगिरी नागपूर पोलीस अधीक्षक मा.विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उप–विभागीय पोलीस अधिकारी श्री. अशोक सरंबळकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. आसिफराजा शेख, सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रवीण मुंडे, पोलीस नाईक श्री. रवी मेश्राम, श्री. ललित उईके यांनी केली.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कार्यवाही :–

दिनांक 18/11/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलिस स्टेशन खापरखेडा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने वलनी येथे रेड केली असता घटनास्थळावर विना क्रमांकाच्या जेसीबी साहायाने आरोपी चालक क्र. 1. श्रीकांत भिमराव उके, वय 27 वर्ष, रा. वार्ड क्र. 3, वलनी, एमएच–40/वाय–1595 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी क्र. 2. टिप्पर चालक(फरार) याच्या टिप्पर मध्ये विना परवाना अवैधरित्या 4 ब्रास रेती किं. 12,00,000/– रू. ही आरोपी क्र. 3. लतीफ हफीज अन्सारी, रा. वलनी याच्या सांगण्यावरून भरतांना मिळुन आले. वाहनासह एकुण कि. 27,12,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक पोलिस निरीक्षक श्री अनिल राउत स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री सुर्यप्रकाश मिश्रा 9923694709 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा.श्री. विजयकुमार मगर यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, सपोनी. श्री. अनिल राऊत, पोलिस हवालदार श्री. ज्ञानेश्वर राऊत, पोलिस नाईक श्री. अरविंद भगत, श्री. शैलेश यादव, पोलिस शिपाई श्री. विरेन्द्र नरड चालक सफौ श्री. साहेबराव बहाळे यांनी पार पाडली. (सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## चोरी

1) पो.स्टे. बेला :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील मौजा बेला टाउन येथे दि. 17/11/2021 चे 23.00 वा. ते दि. 18/11/2021 चे 05.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विलास भैयाजी दिवंज वय 53 वर्ष रा. बेला यांचे राहते बंद घराचे मागिल दारामधुन अज्ञात आरोपीने प्रवेश करून घरातील कपाट खोलुन ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 29,700/–रू. व नगदी 1,000/–रू. असा एकुण कि. 30,700/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अजय चौधरी मो.नं. 9022849580 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 07 कि.मी. अंतरावरील अणामोड येथे दि. 08/11/2021 चे 08.30 वा. ते दि. 09/11/2021 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नरेश मधुकरराव महाजन वय 63 वर्ष रा. महाल नागपुर यांनी दिघोरी रेल्वे येथील डिस्ट्रीक सेन्ट्रल को.ऑपरेटिव बैंक येथुन 40,000/–रू. काढुन एम.एच–49/ए.सी.–2566 क्रमांकाची ॲक्टीव्हा मोपेडनी रामटेकला गेले असता मित्राची भेट न झाल्याने रामटेक मध्ये मित्राचा घर शेतात पवनी येथे गेले असता मनसर मार्ग नागपूर येथे जात असता अंदाजे रात्री 08.30 वा. दरम्यान अणामोड जवळ रोडवर चक्कर आल्याने पडुन राहीले. त्या दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी जवळ असलेले 40,000/–रू. काढुन घेवुन गेले व मोबाईल, आधार कार्ड, पॅन कार्ड, लायसेन्स, काढुन घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नरेश वरकडे मो नं. 9637005303 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 13 कि. मी. अंतरावरील बोरखेडी रेल्वे येथे दिनांक 17/11/2021 चे 20:00 वा. ते 20.30 वा. दरम्यान फिर्यादीचा भाउ नामे– प्रशांत चरणदास लोखंडे वय 44 वर्ष, रा. बोरखेडी रेल्वे ता. जि. नागपुर ह.मु. सिडको डी सेक्टर प्लॉट नं. 13 बुटीबोरी हा रोड वर बसुन असतांना टाटा सुमो गोल्ड सिल्वर रंगाच्या चालक आरोपी नामे– कमलेश खुशाल साठवणे वय 23 वर्ष रा. बोरखेडी रेल्वे याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन प्रशांत लोखंडे यास धडक दिली. त्यास उपचार कामी प्राथमीक आरोग्य केन्द्र बोरखेडी येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्याला तपासुन मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केले. पुढील उपचार कामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता रात्री 10.30 वाजता डॉक्टरांनी मृत घाषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रविण चरणदास लोंखडे, वय 45 वर्ष, रा. बोरखेडी रेल्वे ता. जि. नागपुर ह.मु. सिडको डी सेक्टर प्लॉट नं. 13 बुटीबोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री सोनटक्के मो नं 8329590482 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बेला :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील मौजा सिर्सी ते उमरेड रोड झिनींग जवळ येथे दिनांक 17/11/2021 चे 18:30 वा. दरम्यान फिर्यादीचा मुलगा अंकुश किसनाजी लांगडे (मृतक), वय 35 वर्षे रा. सालेभटटी ता. भिवापूर जि. नागपूर हा त्याच्या एमएच– 31/बिए– 5770 क्रमांकाच्या मोटरसायलने सिर्सी कडुन सालेभटटी गावी जात असता समोरून येणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहन चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघतात फिर्यादीचा मुलगा हा गंभीर जखमी होवुन त्याचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– किसनाजी सखाराम लांगडे, वय 64 वर्षे, रा. सालेभटटी ता. भिवापूर जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री राहुल ठेंगणे मो नं 7972812569 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील लक्ष्मीनगर काटोल येथे दिनांक 18/11/21 चे सकाळी 08.00 वा दरम्यान फिर्यादी यांचा मुलगा नामे– प्रफुल सुधाकर राउत(मृतक), वय 30 वर्ष, रा. तायडे लेआउट आर्वी ता. आर्वी जि. वर्धा, ह.मु. लक्ष्मीनगर, काटोल याचा 5 ते 6 वर्षापासुन नेर जि.यवतमाळ येथे रहीवासी असणारी मुलीशी प्रेमसंबंध होते. मुलीनी लग्न करण्यास नकार दिल्याने तेव्हा पासुन मृतक हा मानसिक तणावात राहत होता माणसिक तणावाला कंटाळुन त्याने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुधाकर व्यंकटवार राउत, वय 61 वर्ष, रा. तायडे लेआउट आर्वी ता. आर्वी जि. वर्धा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हान मो.क्र. 9545363121 हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत वार्ड क्र. 15 पारशिवनी येथे दिनांक 18/11/21 चे सकाळी 08.00 वा दरम्यान सचिन रामदास कोटांगळे (मृतक), वय 28 रा. वार्ड क्र. 15 पारशिवनी याने आपले राहते घरी कोणीही हजर नसतांना दारूच्या नशेत घराचे समोरील रूममध्ये फॅनला दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामदास मारोती कोटांगळे, वय 60 वर्ष, रा. वार्ड क्र. 15, पारशिवनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री दिलीप बासोडे 9823083905 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर